# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर पुणे- ४११००५.

परिपत्रक क्र./शाखा अ/उच्च माध्यमिक परीक्षा/खाजगी विद्यार्थी/ /पुणे- ४११००५. दिनांक २२/१२/२०१६

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विलंब शुल्कानंतरची **खाजगी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे** स्वहस्ताक्षरात भरुन त्यावर विद्यार्थी व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह खालील तारखांप्रमाणे व शुल्काप्रमाणे विभागीय मंडळात सादर करावयाची आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु ५०/-प्रतिदिनी प्रती विद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु १००/-प्रतिदिनी प्रती विद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु २००/-प्रतिदिनी प्रती विद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) फेब्रु/मार्च-२०१७ | शनिवार दिनांक २४/१२/२०१६ ते रविवार दिनांक ०८/०१/२०१७ | सोमवार दिनांक ०९/०१/२०१७ ते सोमवार दिनांक २३/०१/२०१७ | मंगळवार दिनांक २४/०१/२०१७ ते मंगळवार दिनांक ०७/०२/२०१७ |

उपरोक्त तारखांनुसार व शुल्कानुसार कार्यवाही करण्यात यावी. त्याबाबत विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांस परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तर विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे. सदरहु बाब विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावी. व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी या संदर्भात मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्याकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याचीही दक्षता घेण्यात यावी. त्यानुसार उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

23/12/16

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

SHINDE ANIL/PARIPATRAK